

# रयत शिक्षण संस्थेचे

## आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)

### सांस्कृतिक विभाग दिनांक- 31/ 10/ 2020

## भारतरत्न इंदिरा गांधी पुण्यतिथी राष्ट्रीय संकल्प दिवस आणि सरदार वल्लभभाई पटेल

## जयंती व राष्ट्रीय एकता दिवस अहवाल

रामानंदनगर( बुर्ली) येथील आर्ट्स ,सायन्स, अँड कॉमर्स कॉलेज मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी या निमित्ताने प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली.याप्रसंगी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.एल.डी.कदम प्रा.डॉ.के.बी.भोसले, डॉ.ए.एस.खाडे,प्रा.आर.व्ही.वाघमारे,डॉ.आर.आर,सोनावले,प्रा.नितीन कुंभार,प्रा.उमेश शेळके,प्रा.संदेश दौंडे,प्रा.नंदा बोराडे,प्रा.धनेश गवारे,प्रा.प्रियांका जिरगे, तसेच सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.प्रतिभा पुदाले व विद्यार्थिनी उपस्थित होते.

सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म 31 ऑक्टोंबर,1875 रोजी झाला. वल्लभभाई पटेल हे राजकीय व सामाजिक नेते होते. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या राजकीय एकसंघीकरणात मोठे योगदान दिले. त्यांना ‘सरदार’ ही उपाधी दिली .सरदार वल्लभभाई पटेल हे पेशाने वकील होते. गुजरातमध्ये जगातील सर्वात उंच पुतळा म्हणजे स्टॅच्यू ऑफ युनिटी उभारण्यात आला आहे. त्यांना ‘लोहपुरुष’, ‘पोलादी पुरुष’ म्हणून संबोधले जाते. त्यांचे निधन 15 डिसेंबर 1950 रोजी झाले.

इंदिरा गांधी... भारताच्या पहिला महिला पंतप्रधान.... जन्म 19 नोव्हेंबर, 1917 अचूक निर्णय घेणाऱ्या, स्पष्ट बोलणाऱ्या, धैर्यशील वृत्तीच्या आणिकणखर नेतृत्व असणाऱ्या इंदिरा गांधी या लहानपणापासूनच स्वातंत्र्यचळवळीत सहभागी होत्या. बांग्लादेशच्या उभारणीवेळी त्यांची भूमिका ,14 प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण, आणि पोखरण येथील पहिली अणुचाचणी, ऑपरेशन ब्लू स्टार या त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना होत्या. इंदिरा गांधी:-एक कणखर नेतृत्व हे डॉ. जुबेदा तांबोळी यांचे पुस्तक लोकप्रिय आहे. भारतात आणि भारताबाहेर त्यांचा सन्मान झाला आहे. त्यांचे निधन 31 ऑक्टोबर, 1984 रोजी झाले.

देशहित आणि लोकाभिमुख निर्णय घेणाऱ्या कणखर महिला पंतप्रधान स्वर्गीय इंदिराजी गांधी यांच्या स्मृतीदिनी त्यांच्या कृती, स्मृती आणि विचारांना विनम्र आदरांजली..! आणि लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन

शासकीय नियमानुसार सामाजिक अंतर व मास्कचा वापर करून प्रतिमापूजन व राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली.

निष्पत्ती(outcome)—

1.इंदिरा गांधी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याची माहिती मिळाली.

2.राष्ट्रीय एकतेचा संदेश पोहोच झाला.

लाभार्थी (Benefisharies):--

महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर सेवक आणि उपस्थित विध्यार्थी







भारतरत्न इंदिरा गांधी आणि सरदार वल्लभभाई पटेल प्रतिमा पूजन आणि राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य आणि स्टाफ

प्रा. प्रतिभा पुदाले
चेअरमन,
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स ॲंड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)